**श्री शिवाजी शिक्षण संस्था,उच्च शिक्षण मंडळ कराडचे,**

**वेणूताई चव्हाण कॉलेज,कराड**

**भूगोलशास्त्र विभाग**

# प्रश्नपेढी

**B. A. - I (SEM-I) (NEP-2.0) Examination Oct / Nov.**

Course Name: Introduction to Indian Knowledge System (Generic)

Course No.: 01

Sub Code: 107088

## प्रश्न १. योग्य पर्याय निवडून वाक्ये पुन्हा लिहा. (प्रत्येकी ०२ गुण)

१. भारतीय मतानुसार ज्ञान हे केवळ बौद्धिक प्रक्रिया नसून **आत्मविकासाचे** साधन आहे.

२. भारतीय ज्ञानप्रणालीचा मुख्य स्रोत **वेदांमध्ये** आहे.

३. आयुर्वेदामध्ये आरोग्यविषयक चर्चा आहे.

४. योग हे निरामय आरोग्याचे साधन आहे.

५. शून्याचा शोध हे भारतीय गणिताचे महान योगदान आहे.

६. प्राचीन काळात गुरुकुल पद्धती शिक्षणाच्या क्षेत्रात होती.

७. भारतीय तत्त्वज्ञानाचे दोन वर्ग आहेत.

८. योगाचे मुख्य उद्दिष्ट आत्मज्ञानाची प्राप्ती आहे.

९. पतंजली हे योगशास्त्राचे रचनाकार आहेत.

१०. योगाची आठ अंगे आहेत.

११. सांख्यदर्शनाचे आचार्य कपिल हे प्रवर्तक आहेत.

१२. वेद चार आहेत.

१३. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद यांना संहिता म्हणतात.

१४. न्यायदर्शनानुसार ज्ञानाची चार साधने आहेत.

१५. महर्षी कणाद हे वैशेषिक दर्शनाचे प्रवर्तक होत.

१६. वैशेषिक दर्शनानुसार परमाणुवाद हा महत्त्वपूर्ण वैज्ञानिक सिद्धांत सांगितला.

१७. वेदांतानुसार आत्मज्ञानाला महत्त्व आहे.

१८. अद्वैत वेदांताची मांडणी आचार्य शंकर यांनी केली.

१९. चार्वाक, जैन, बौद्ध ही नास्तिक दर्शने होत.

२०. जी दर्शने वेद मानत नाहीत त्यांना नास्तिक म्हणतात.

२१. चार्वाक हे भौतिकवादी दर्शन आहे.

२२. बौद्ध दर्शनानुसार आर्यसत्ये चार आहेत.

२३. बौद्ध तत्त्वज्ञान भगवान बुद्धांनी सांगितले.

२४. भगवान महावीर हे २४ वे तीर्थंकर होत.

२५. अनेकांतवाद ही जैन दर्शनाची जगाला महान देणगी आहे.

२६. कर्मसिद्धांत हे भारतीय तत्त्वज्ञानाचे सामान्य वैशिष्ट्य आहे.

२७. १८ पुराणे प्रामुख्याने मान्य केली आहेत.

२८. पुराणांच्या माध्यमातून समाजात नीतिमत्तेची रुजवण होते.

२९. सुभाषित हे कमी शब्दांत सुंदर अर्थ मांडते.

३०. 'अति सर्वत्र वर्जयेत' याचा अर्थ अतिरेक टाळावा.

३१. ऋत या तत्त्वाने विश्वाची व्यवस्था व्यक्त होते.

३२. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वेदकाळाला सुवर्णयुग म्हटले.

३३. जो वारी करतो तो वारकरी होय.

३४. वारकरी संप्रदायाचे मुख्य दैवत श्री विठ्ठल आहे.

३५. ठराविक काळाने पंढरपूरला जाणे म्हणजे वारी होय.

३६. 'चरकसंहिता' हा ग्रंथ आचार्य चरक यांनी रचला.

३७. सुश्रुतसंहितेत शल्यचिकित्सेला महत्त्व दिले आहे.

३८. पंचकर्म ही आयुर्वेदातील महत्त्वाची उपचार पद्धती आहे.

३९. कौटिल्य यांनी 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ लिहिला.

४०. कौटिल्य यांनी राजनीती व दंडनीतीचा समन्वय सांगितला.

४१. कौटिल्य यांनी तीन पुरुषार्थ सांगितले.

४२. कौटिल्य यांनी आन्वीक्षिकी विद्येला महत्त्व दिले.

४३. डोंगरावरील किल्ल्यांना गिरिदुर्ग म्हणतात.

४४. **राजगड** याला गडांचा राजा म्हणतात.

४५. चित्तोडगड **हा राजस्थानात** आहे.

४६. ग्वाल्हेर किल्ला **मध्यप्रदेशात** आहे.

४७. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म **शिवनेरी** किल्ल्यावर झाला.

४८. प्राचीन ते मध्ययुगीन काळात राज्यकारभार **किल्ल्यांवरून** चालत असे.

४९. हडप्पा संस्कृती **वेदपूर्वकालीन** आहे.

५०. हडप्पा संस्कृतीचा उदय **सिंधू** खोऱ्यात झाला.

**प्रश्न २. थोडक्यात टिपा लिहा.**

१. कौटिल्याचे अर्थशास्त्र

२. चरकसंहिता

३. सुश्रुतसंहिता

४. बौद्ध तत्त्वज्ञान

५. महाराष्ट्रातील किल्ले

६. सुभाषितांचे महत्त्व

७. वैदिक जीवन

८. वेद

९. योग

१०. वारकरी संप्रदाय

११. विपश्यना

१२. पुराणे

**प्रश्न ३. सविस्तर उत्तर लिहा.**

१. भारतीय ज्ञानप्रणाली म्हणजे काय? तिचे स्वरूप व महत्त्व स्पष्ट करा.

२. वेदांचे स्वरूप स्पष्ट करा.

३. योग व विपश्यना यांचे स्वरूप स्पष्ट करा.

४. हडप्पा संस्कृतीची वैशिष्ट्ये व महत्त्व स्पष्ट करा.